## ८. वर्णाश्रमव्यवस्थेला धरून पुराणकथांची नैतिकता

पुराणकथांचा अभ्यास करताना त्यांचा सामाजिक संदर्भ लक्षात घेणे गरजेचे आहे. यासंदर्भात 'पुराणकथा म्हणजे अस्तित्वात असलेल्या सामाजिक संस्थांच्या दृष्टीने मान्यतेची सनदच होय' हे बी. मॅलिनोव्हस्कीचे मत मननीय आहे. पुराणकथेचा समाजरचनेवर परिणाम झालेला दिसतो तर दुसरीकडे समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब पुराणकथांत पडलेले आढळते.

पुराणकथांचे माध्यम हे अत्यंत प्रभावी आहे. अनेक प्रकारच्या चालीरीती, रूढीपरंपरा, कृषी, शिकार इ. अनेक गोष्टींचे ज्ञान या कथा करून देतात.

प्राचीन भारतीय समाज चातुर्वर्ण्यावर उभारलेला होता. चातुर्वर्ण्य ही एक समाजसंघटनेची श्रेष्ठ प्रतीची योजना होती. सनातन धर्माने उपयोजिलेली समाजसंघटनात्मक अशी ही उपपत्ती, हिच्यावर प्रकाश टाकणा-या काही कथा, त्यातील नैतिकता व अनैतिकता यांची चिकित्सा या प्रकरणात करीत आहे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण हिंदू धर्मशास्त्रात मानलेले आहेत. या चारही वर्णांची कर्तव्ये, अधिकार, व्यवहार, परस्परावलंबित्व, परस्परपूरकत्व इ. गोष्टींचा विचार करून धर्मशास्त्रकारांनी देशात निर्माण केलेली चौकट म्हणजे चातुर्वर्ण्य. या चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचे ज्ञान पुरूषसूक्तातील पुराणकथेवरून होते.

**पुरूषसूक्तातील कथा :**

पुरूषसूक्तातील कथेनुसार परमपुरूषापासून चारही वर्ण निर्माण झालेले आहेत. परमपुरूषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पायांपासून शूद्र जन्मास आले, असा उल्लेख तेथे आढळतो.

(ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः।

ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत।।) ।

वस्तुतः एकाच परमपुरूषापासून चारही वर्ण निर्माण झाले असे या सूक्तातील पुराणकथेत सांगितले जाते. त्यात उच्चनीचत्व असे काहीच सांगितलेले नाही. परंतु नंतरच्या कालात या वर्णांमध्ये उच्चनीचत्वाचे भेद अधिक तीव्रपणे केले गेले असावेत. वर्णव्यवस्थेच्या अतिरेकी अभिमान्यांनी तिचे महत्व वाढविण्यासाठी त्यांच्यातील भेद अधिक तीव्र केले असावेत.

वास्तविक या सूक्तात एकाच परमपुरूषापासून चारही वर्ण निर्माण झाले म्हणजे ते चारही एकाच परमेश्वराची लेकरे या नात्याने ते चारही वर्ण समान दर्जाचेच आहेत. किंबहुना, तप, संस्कार व आचारपरिपालन या गोष्टींनी अनेक पुरूष नीच कुलातून उच्चकुलात जात होते. उदा. कैवर्त स्त्रीपासून झालेले व्यास, चांडाल स्त्रीपासून झालेले पराशर, गणिकेपासून झालेले वसिष्ठ. हे सर्व नीच कुलात जन्मूनही आपल्या तपःसामर्थ्याने त्यांनी ब्राह्मणत्व संपादन केले होते.

उग्र तप करून विश्वामित्राने क्षत्रियत्वातून ब्राह्मण्य प्राप्त करून घेतले व वसिष्ठाने त्या गोष्टीला मान्यता दिली[2].

ही सर्व उदाहरणे केवळ जन्म हेच वर्णप्राप्तीचे गमक नव्हते असे सांगतात. एवढेच नव्हे तर एकाच कुळात अनेक वर्ण निर्माण झाल्याच्याही कथा आहेत. उदा. वेन हा क्षत्रिय होता. त्याच्या मृत्यूनंतर ब्राह्मणांनी त्याच्या देहाचे मंथन केले व त्यात त्याच्या डाव्या भागापासून निषाद व म्लेंच्छ जन्मले व उजव्या भागापासून क्षत्रिय निर्माण झाले.[3]

मनु हा क्षत्रिय. त्याला झालेला वामदेव हा पुत्र ब्राह्मण बनला. वामदेवाला जी संतती झाली त्यात चारही वर्ण निर्माण झाले.

या सर्वांवरून वर्ण हे जन्मावरून ठरत नसून गुणांवरून ठरत होते हे प्रकर्षाने जाणवते. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" याची प्रचीती येते. उच्चकुलात जन्म घेऊन गुणकर्माने हीन कुलात गेलेले व हीन कुलात जन्म घेऊन उच्चकुलात दाखल झालेल्या माणसांची अनेक उदाहरणे आपणास आढळतात. म्हणजेच त्याकाळी वर्णव्यवस्था ही शिथिल होती सहजपणे आपल्या गुणकर्माने मनुष्य अन्यवर्ण प्राप्त करून घेऊ शकत असे तसेच जन्मावरून प्राप्त झालेल्या वर्णानुसार योग्य कर्म केले नसेल तर त्याला नीचवर्णही प्राप्त होत

असे. कालांतराने या मर्यादा नष्ट होऊन जन्मावरूनच वर्ण मानण्याची प्रवृत्ती बळावलेली दिसते.

**शबरीची कथा :**

सुग्रीवाशी सख्य करण्यास जाताना राम-लक्ष्मण पंपा सरोवराच्या काठी शबरीच्या आश्रमात येऊन पोहोचले. शबरी ही त्या भागातील आदिवासी भिल्लीण होती. ती मतंग ऋषींची शिष्या होती. गुरूच्या आज्ञेप्रमाणे ती तेथे तपश्चर्या करीत होती. तिने रामाचे व लक्ष्मणाचे हार्दिक स्वागत केले. पाय धुऊन आचमनास पाणी दिले आणि रामासाठी निवडून साठविलेली वन्य मधुर फळे रामाला समर्पण केली. रामाने तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला व तिला कुशल विचारले "तुझी गुरूसेवा सफल झाली काय? तुझ्या तपाची साधना निर्विघ्नपणे पार पडली काय? (क्वचित् तेवर्धते तपः?)[4] म्हणून विचारणाही केली.

तेव्हा "तुझ्या दर्शनाने माझे तप सुफल झाले गुरूशुश्रूषा फळाला आली आणि जन्माचे सार्थक झाले" असे ती म्हणाली, "तू भक्तिभावाने माझी पूजा व सत्कार केल्यास त्याने मी संतुष्ट आहे. तू आपल्या इष्ट गतीला जा" असा तिला रामाने आशीर्वाद दिला.

या सर्व कथानकावरून शबरीसारख्या एका वन्य जमातीच्या माणसाने केलेली भक्ती व तपश्चर्या सुद्धा रामाला संमत व रूजू होती. तिचा आश्रम त्याला पवित्र वाटत होता व श्रेष्ठ गती मिळविण्याची तिची पात्रता होती असे रामाचे निश्चित मत असल्याचे स्पष्ट दिसून येते.

शबरीविषयी वाल्मीकींनी म्हटले आहे,

"राघवः प्राह विज्ञाने तां नित्यमबहिष्कृताम्।"[5]

ज्ञानामध्ये कधीही बहिष्कृत नसलेल्या शबरीशी रामचंद्र बोलले. येथे शबरी ही समाजात मात्र बहिष्कृत समजली असावी असे सूचित होते यावरून शबर जात त्याकाळी बहिष्कृत मानीत असावेत तरीही शबरीचे शुद्ध अंतःकरण व तपश्चर्या यामुळे रामाला तिच्याबद्दल आदर वाटत होता. एवढेच नव्हे तर तिचे तपाचरणही त्याला मान्य होते.

शबरीची तपश्चर्या सिद्धांना ही मान्य होती व रामानेही तिची पवित्र तपस्विनी म्हणून विचारपूस केली. (रामेण तापसी पृष्टा सा सिद्धा सिद्धसंमता।)[6]

खालच्या थरातील लोकांना राम वा सिद्ध हीन मानीत नव्हते व त्यांना तपश्चर्येचा अधिकार नाही असा त्यांचा समज नव्हता.

त्रैवर्णिकांच्या धर्मक्रिया शूद्रांनी अमंत्रक आचरल्यास त्यांना दोष लागत नाही, एवढेच नव्हे तर त्यांची कीर्ती वाढविणा-या असतात असे मनुचे वचन आहे.

'धर्मप्सवस्तु धर्मज्ञाः सतां वृत्तमनुष्ठिताः।

मन्त्रवर्जं न दुष्यन्ति प्रशंसां प्राप्नुवन्तिच।। [7]

म्हणजेच शूद्राने तपाचरण केले तर ते वर्णधर्माला विरूद्ध असे अक्षम्य पाप होय अशी रामाची भावना नव्हती. रामाच्या नंतरच्या कालात वर्णव्यवस्था दृढतर झाली असावी. तिच्या अतिरेकी अभिमान्यांनी तिचे महत्व वाढविण्यासाठी शंबूकवधाची कथा रचली असावी असे दिसते.

येथे राम हा अत्यंत उदार हृदयाचा होता. सामान्यांवर त्याचे नितांत प्रेम होते. सर्वांठायी त्याच्या मनात समभाव होता. कुठल्याही त-हेची संकुचित वृत्ती त्याचे ठिकाणी नव्हती आणि यामुळे आदर्श रामाची प्रतिमा अधिकच उजळून निघते.

**अजामीळ** :

हा कान्यकुब्ज देशातील एक ब्राह्मण. हा प्रथम सदाचारी होता. पण पुढे एका वेश्येच्या नादी लागून वृद्ध आईबापांचा व विवाहित स्त्रीचाही याने त्याग केला. वाटसरू लोकांना लुटणे, द्यूत खेळणे, फसविणे व चो-या करणे इ. साधनांनी हा कुटुंबपोषण करी अशी याची अठ्ठयाऐंशी वर्षे गेली. त्या वेश्येपासून याला दहा मुले झाली. त्यापैकी धाकटया नारायणावर याचा फारच लोभ असे. पुढे मरणसमय आला असतानाही हा नारायणालाच हाका मारीत होता. केवळ नामस्मरणाच्या माहात्म्याने यमदूतांच्या हातून विष्णुदूतांनी याला सोडविले. तेव्हा यमदूत व विष्णुदूत यांच्यात झालेला संवाद याच्या कानी आला. यमदूताने सांगितलेला वेदप्रतिपादित गुणाश्रित धर्म आणि विष्णुदूताने केलेल्या शुद्ध भागवतधर्माचे प्रतिपादन ऐकून कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन अजामिळाची हरीवर भक्ती जडली. शेवटी हा हरिद्वारला गेला व त्याने गंगेत देहत्याग करून मुक्त झाला. [8]

अजामीळाची ही कथा भागवतधर्माचा पुरस्कार करते. हरिनामाचा महिमा गाते हे निःसंशय.

तसेच या कथेत वर्णाश्रमांचे कर्तव्यही सांगितलेले आहे. अजामिळ हा ब्राह्मण आपल्या कर्तव्याला चुकला होता. ब्राह्मणाची कर्तव्ये विसरून, त्याने आपल्या त्याग केला एवढेच नव्हे तर सर्व अधर्माचरण करू लागला. कोणत्याही न्याय वा अन्याय मार्गाने तो द्रव्यार्जन करीत होता व त्याच्या साहाय्याने एका वेश्येच्या परिवाराचे पोषण करीत असे त्यामुळे शास्त्राचे ही तो उल्लंघन करीत असे. अपवित्र पदार्थांचे सेवन करीत असे त्याने प्रवाशांना लुटणे, द्यूत खेळणे, फसविणे चो-या करणे, इतर प्राण्यांना पीडा देणे इ. दुराचाराचा ही आश्रय घेतला. स्वतःचे कुल, धर्म, आचार यांचे सर्वस्वी विस्मरण त्याला झाले होते म्हणून त्याला नेण्यास यमदूत आले होते.

पापी, दुर्वर्तनी, अधर्माचरणी लोकांचा शेवटही तसाच होतो. त्याने केलेल्या पातकांच्या हिशेबाने त्याला फळे भोगावी लागतात. अशा पापी माणसाला यमराजाकडे दंड भोगावा लागतो असे यमदूत सांगतात. विहित स्वधर्माचा त्याग करून अधर्माचरण करणा-यास दंड प्राप्त होतो हेच ही कथा सांगते आणि म्हणून माणसाने अधर्माचरण करू नये.

पण समजा केलेच तर त्यावर योग्य ती उपाय ही, ही कथा सूचविते. केलेल्या पातकांसाठी प्रायश्चित्त घेतले पाहिजे. पश्चात्तापयुक्त अंतःकरणाने जर प्रायश्चित्त घेतले तर ते पाप धुऊन जाते. आणि हे प्रायश्चित्त अत्यंत सोपे आहे केवळ हरिनाम. या कथेत तर अजामीळ हा आपल्या सर्वात धाकटया मुलाचे नाम घेत होता सुदैवाने त्याचे नाव नारायण होते या केवळ नामस्मरणाने अजामीळाभोवतीचा यमदूताचा फास नाहीसा झाला. व तो विरागी होऊन मुक्त झाला.

अर्थातच ही कथा भागवतधर्माचा पुरस्कार करण्यासाठी व हरिनाममहिमा गाण्यासाठी आली आहे आणि त्यामुळे त्यात थोडीफार अतिशयोक्ती आहेच. कितीही पापाचरण केले व शेवटी नारायणाचे नाव घेतले तर त्या पापापासून मुक्तता होते असाच काहीसा सूर या कथेचा आहे आणि त्यामुळे माणसाला दुर्वर्तनाची भीतीच रहाणार नाही. म्हणून हरिनाम हे पश्चात्तापदग्ध होऊन निर्मळ अंतःकरणाने घ्यावे असे विष्णूदूत सांगतात. माणसाला परमेश्वरभक्तीची गोडी लावण्यासाठी ही कथा सांगितली आहे. परमेश्वरचिंतनामुळे आपोआपच माणसाचे वर्तनही सुधारते. अंतीम कल्याण साधते हे सांगण्यासाठी या कथेत विष्णूदूतांची योजना आहे. माणसाला आपला नित्यनैमित्तिक धर्म, कर्तव्ये पार पाडून ईशोपासना करायला सांगण्याचे काम ही कथा करते. वाईट वर्तन करून

जर खरेच एखाद्याला त्याबद्दल पश्चात्ताप होत असेल तर हरिनामाचा उत्तम उपाय त्या दुष्कृत्यांसाठी आहे असा दिलासा ही कथा देतो.

**मांधातृची कथा** :

मांधाता हा अत्यंत दानशूर राजा होता. तो एकदा राज्य करीत असता बराच काल अवर्षण पडून याच्या राज्यात हाहाःकार उडाला. वेदाध्ययनादि कर्मे बंद पडली याने पुष्कळ विचार केला. परंतु दुष्काळाचे कारण याला समजले नाही. पुढे आंगिरस ऋषी याच्याकडे आले. त्यांना याने दुष्काळाचे कारण विचारले, तेव्हा आंगिरस ऋषींनी याला सांगितले की, "तुझ्या राज्यात एक वृषल तप करीत आहे. त्याचा तू वध करशील तर दुष्काळ नाहीसा होईल." परंतु मांधात्याने तपस्व्याचा वध करण्याचे नाकारले. त्यासाठी त्याने स्वतः उग्र तप केले. पद्मा नावाची एकादशी केली. या त्याच्या तपामुळे पाऊस पडून दुष्काळनिवारण झाले. [9]

याही कथेत एक वृषल म्हणजेच बहिष्कृत तप करीत असल्याने राज्यामध्ये दुष्काळ पडला असा उल्लेख आहे. म्हणजेच शूद्राला तपाचरणाचा अधिकार त्याकाळी नव्हता, हे या कथेत उल्लेखिलेले आहे. व जेव्हा असा अधिकार नसतानाही ती गोष्ट केली तर त्यामुळे राज्यामध्ये काहीतरी अद्भूत घडते, राज्यावर संकट येते, असे सांगणारी ही कथा शंबूकवधांच्या कथेची आठवण करून देते.

एका वृषलाला तपाचा अधिकार नसताना तो ते तप करतो त्यामुळे राज्यावर अवर्षणाचे संकट कोसळते तेही अत्यंत तीव्र स्वरूपाचे. अवर्षणाचे कारण शोधण्याचा प्रयत्न केल्यानंतर वृषलाचे तप हेच अवर्षणाचे कारण राजाला समजते. परंतु मांधाता मात्र आंगिरसाने सल्ला दिला असतानाही त्या वृषलाला मारत नाही. त्याच्या तपामुळे निर्माण झालेले संकट टळावे म्हणून तो स्वतः तपश्चर्या करतो. स्वतःच्या उग्र तपश्चर्येच्या जोरावर तो अवर्षण निवारण करतो. येथे वास्तविक मांधात्याला वृषलाला मारता आले असते. परंतु राजा या नात्याने त्याच्या राज्यातील तो वृषल त्याची प्रजा होती. त्या प्रजेचे व तिच्या अधिकाराचे संपूर्णतः रक्षण करण्याची सर्व जबाबदारी राजा या नात्याने मांधात्याकडे होती व म्हणूनच तो ती जबाबदारी पार पाडून स्वतः त्यासाठी तप करतो व एकप्रकारे प्रायश्चित्तच घेतो. परंतु वृषलाला मारण्याचे अधमकृत्य करीत नाही. वृषल असला तरीही तो तपस्वी आहे हे समजून मांधाता त्याला ठार मारीत नाही पण स्वतः तो दोष नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करतो. [10]

तसेच येथे अंगिरस ऋषी तप करणा-या वृषलाला ठार करण्याचा सल्ला देतात. येथे अशी शंका येते की, वृषलाने तप करणे हे पातक आहे आणि मग नरहत्या हे पातक नाही का? वृषल हा जरी बहिष्कृत असला तरी तो माणूस आहे की माणूस म्हणूनही वागणूक त्याला त्या काळी अंगिरसांसारख्या ब्राह्मण तपस्व्यांकडून मिळत नव्हती? कारण मांधाता राजा असूनही त्याला मारीत नाही परंतु अंगिरस मात्र सहज त्याच्या वधाचा सल्ला देतात. तेव्हा असा ही विचार येतो की, यामागे कदाचित शूद्र तपश्चर्या करून आपला अधिकार काढून घेतील अशाप्रकारची भीतीही असावी. नाहीतर तपासारखे सहज, सुलभ , निरूपद्रवी हक्क शूद्रांना न देण्याचे कारण काय? किंवा एखादे संकट कोसळले तर त्यामागची कारणमीमांसा न जाणताच त्याचे पातक दुस-याच्या माथी मारण्याच्या माणसाच्या सहजप्रवृत्तीला अंगिरसही अपवाद नसावेत. आता हा दोष वृषलाच्याच माथी का असा विचार करता मात्र पुन: पहिलीच शंका बळावते की, तपाच्या आधारे वृषलश्रेष्ठ ठरेल, वरचढ ठरेल म्हणून त्यालाच पातकी मानून नाहीसे करणे हे योग्य.

अर्थात् त्याकाळी कित्येक शूद्र आपल्या वर्तनाने ब्राह्मणत्वास प्राप्त होत होते, असे असताना वृषल हा ही ब्राह्मणत्वास प्राप्त झाला असता त्यासाठी त्याला मारावयाचे कशाला? असे अनेक प्रश्न ही कथा निर्माण करते.

परंतु एवढे मात्र खरे की, मांधातासारख्या उदार, समंजस, दानशूर राजाचे वर्तन ही मनात खोलवर कुठेतरी रूजते, अंत:करणाला सुखावून जाते.

**शुन:शेपाची कथा** :

हरिश्चंद्र राजाचे पोटी, त्याला शंभर स्त्रिया असूनही संतान नव्हते. पुत्रप्राप्तीसाठी त्याने वरूणराजाची प्रार्थना केली व पुत्रप्राप्तीबद्दल त्याच्याकडे याचना केली. वरूणाने जन्मल्याबरोबर तो पुत्र यज्ञात देवांस द्यावा या अटीवर हरिश्चंद्राची ती याचना मान्य केली. पुढे त्यास रोहित नामक पुत्र झाला. तेव्हा वरूणाने त्यास यज्ञात देण्याची आठवण केली. तेव्हा हरिश्चंद्राने त्यास दहा दिवस होऊ देत, नंतर दात येऊ देत, नंतर क्षत्रियत्व संस्कार मिळू दे अशा अटींवर पुत्रयज्ञ करण्याचे वरचेवर लांबणीवर टाकले. रोहिताने धनुष्य घेऊन वनात पलायन केले व वरूणाशी लबाडी केल्यामुळे हरिश्चंद्रास 'जलोदर' होऊन त्याचे पोट फुगले. पुढे

इंद्राचे सांगण्यावरून तो रोहित सहा वर्षे अरण्यात फिरत होता. इतक्यात त्यास अजीगर्त नामक ऋषी भेटला व त्याच्या तीन पुत्रांपैकी एकास आपल्याबद्दल वरूणास देण्याकरिता त्याने विकत मागितले. अजीगर्त थोरला मुलगा देईना व धाकटा त्याची माता देईना म्हणून मधला जो शुनःशेप नामक पुत्र तो रोहिताने शंभर गाईस विकत घेतला व त्यासह हरिश्चंद्राकडे येऊन त्याने वरूणयज्ञ करून शुनःशेपास बळी देण्यास सांगितले. वरूणाने क्षत्रियापेक्षा ब्राह्मण उत्तम म्हणून शुनःशेपाचा स्वीकार करण्याचे कबूल केले.[10] यज्ञप्रसंगी विश्वामित्र ऋषी यांनी होत्याचे कार्य घेतले. दुसरा कोणी शुनःशेपाचे हनन करण्यास तयार होईना तेव्हा अंजीगर्ताने शंभर गाई घेऊन आपला मुलगा शुनःशेप यास मारण्याचे काम अंगावर घेतले शुनःशेपास जेव्हा आपणास यज्ञात बळी देणार असे कळले तेव्हा त्याने वरूणाची व इतर देवतांची स्तुती केली व नंतर विश्वामित्राने त्याला आपला पुत्र स्वीकारले. परंतु विश्वामित्राच्या शंभर पुत्रांपैकी थोरल्या पन्नास मुलांस शुनःशेपाचे बंधुत्व मान्य न झाल्यामुळे विश्वामित्राने तुमची प्रजा चांडाल होईल असा त्यांना शाप दिला. अजीगर्ताने शुनःशेपाची आपल्या कुलांत येण्याबद्दल प्रार्थना केली परंतु शुनःशेपाने पूर्वीच त्याचे प्रेम ओळखले होते.[11]

हरिश्चंद्रासारखा राजा जो स्वप्नात दिलेले राज्य सत्यात देतो तो आपला पुत्र वचन देऊनही वरूणाला देत नाही. या दोहोतील विसंगती धक्क करणारी आहे रोहित आपल्याऐवजी बळी देण्यासाठी शुनःशुपाला खरेदी करतो. वरूण क्षत्रियापेक्षा ब्राह्मण अधिक उत्तम म्हणून मान्य होतो ही कल्पनाच इतकी विलक्षण व अतर्क्य आहे.

केवळ शंभर गाईंसाठी अजीगर्त ब्राह्मण आपला मधला पुत्र शुनःशेप यास रोहितकडे सुपूर्द करतो. आपला लाडका थोरला व पत्नीचा लाडका धाकट म्हणून त्या दोघांना देण्याचे तो नाकारतो व मधल्या पुत्रास मात्र विकतो आणि तेही बळी देण्यासाठी म्हणून माता-पिता व पुत्र या नात्याला अत्यंत धक्कादायक ही गोष्ट आहे. वस्तुतः कित्येक माता-पित्यांना मुलांचा त्यागही केला असे सांगणा-या आणिकही काही कथा असतील. माता-पित्यांना त्याग करावाही लागत असेल परंतु त्यामागे काही खराच कसोटीचा क्षण असेल, काही असामान्य त्याग असेल. अशावेळी ते वर्तन स्पृहणीय असेल. परंतु अजीगर्तासारखा माणूस शुनःशेपाला केवळ शंभर गाईंसाठी यज्ञबळी म्हणून देण्यास तयार होतो. क्षणभर आपण असेही मानू की, अजीगर्त परिस्थितीने गांजलेला असेल पण

म्हणून शुन:शेपासच का विकावे. थोरला वा धाकटा पुत्र का नाही? आई-वडिलांचे आपल्याच पुत्रांवर असे कमी-जास्त प्रेम असते का? कदाचित् 'हो' असे उत्तर मानले तरीही त्यासाठी आपल्या पुत्राला बळी देणारे आईबाप हे नवलच वाटते. शुन:शेपाचा दोष म्हणजे तो थोरला वा धाकटा म्हणून जन्माला आला नाही हेच होय. अजीगर्ताचे हे वर्तन अत्यंत निंद्य आहे. त्याने परिस्थिती पोटी शुन:शेपाला विकले असे मानू परंतु तरीही आजही परिस्थितीपोटी सर्व कुटुंबच आत्माहुती देण्याच्या घटना घडतात. एखाद्याला त्या परिस्थितीपोटी बळी देण्याचे निंद्य, त्याज्य कर्म करीत नाही. परंतु अजीगर्ताने मात्र हे कर्म केले व त्याही पुढे जाऊन शुन:शेपाची हत्या करण्यासही तो तयार झाला. इतर कोणी नरबळी देण्यास तयार होईना तेव्हा शुन:शेपास बळी देण्यास अजीगर्त प्रत्यक्ष त्याचा पिता तयार झाला. यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणतीही नाही. म्हणून शेवटी पुन: परत अजीगर्ताने बोलाविले तरीही शुन:शेप गेला नाही ते अत्यंत योग्यच वाटते.

वस्तुत: नरबळी देणे हे अत्यंत घृणास्पद पण येथे शुन:शेपाला बळी म्हणून देण्याचे ठरते तेव्हा वरूणाला शुन:शेप हा ब्राह्मण म्हणून अधिक योग्य म्हणून स्वीकारतो. नरबळी देण्यासाठी सुद्धा क्षत्रियापेक्षा ब्राह्मण बरा असे प्रत्यक्ष म्हणतो याचे नवलच वाटते. नरबळीसाठी म्हणून क्षत्रियापेक्षा ब्राह्मण बरा अशी श्रेणी वा तरतमभाव असणे कधीतरी शक्य आहे काय? या कथेत त्याकाळी ब्राह्मण या वर्णाला अधिक महत्व होते म्हणून क्षत्रियापेक्षा ब्राह्मण बरा असे वरूण म्हणतो असे वाटते. वस्तुत: माणसाचा बळी यज्ञात देणे यासारखे निषिद्ध काहीच नाही. आणि त्यातही क्षत्रिय, ब्राह्मण असा बळी हवा हे म्हणणे म्हणजे अत्यंत अश्लाघ्य होय .नरबळीसाठी सुद्धा ब्राह्मण क्षत्रिय असा भेद करीत होते. म्हणजेच वर्णाश्रम व्यवस्था व तिचे पालन अत्यंत कडकरीतीने होत असावे.

अजीगर्तासारखा ब्राह्मण पण त्याचे वर्तन मात्र ब्राह्मण धर्माला योग्य वाटत नाही. तत्वनिष्ठता आढळत नाही. अर्थात् नरमेधाचा निषेध करण्यासाठीच ही कथा असावी आणि म्हणून शेवटी शुन:शेपाचा बळी दिला गेला नाही. देवता प्रसन्न होऊन शुन:शेपाची सुटका करतात व विश्वामित्र त्याला आपला पुत्र म्हणून स्वीकारतात. त्याचवेळी आपल्या थोरल्या पन्नास पुत्रांनी शुन:शेपाचे बंधुत्व नाकारले म्हणून त्यांना शाप देतात की, "तुमची प्रजा चांडाल होईल."

एकीकडे ब्राह्मण नरबळी मिळाला म्हणून वरूण सुखावतो तर एकीकडे विश्वामित्र आपल्या पुत्रांची

प्रजा म्हणजेच पर्यायाने स्वतःचीच नातवंडे चांडाल होवोत अशी इच्छा शापाद्वारे प्रकट करतात. दोन्ही परस्परविरोधी गोष्टी अनाकलनीयच आहेत.

नरबळी हा फार पूर्वी या कथेपूर्वी असावा असे वाटते. म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी ही कथा असावी असे दिसते.

**शूद्राचे स्वर्गारोहण :**

अत्यंत निर्लोभी असा एक शूद्र होता. तो दुस-याचे धन कधीच घेत नसे. एकदा एका नदीतीरावरील फळाच्या करवंटीत सोन्याचा तुकडा दिसला तरीही त्याने तिकडे दुर्लक्ष केले.

एकदा भगवंतांनीच क्षपणकाचे रूप घेतले व त्याच्या गावी येऊन त्याच्या पत्नीला सांगितले, "विधात्याने दिलेले धन तुझ्या मुर्ख पतीने सोडून दिलेले आहे. त्यामुळे तुझा पती जिवंत आहे. तोपर्यंत तुला असेच दरिद्री जीवन जगावे लागेल." क्षपणकाचे बोलणे ऐकून शूद्रस्त्री घरी आली व आपल्या पतीला धनाची गोष्ट करू लागली. तेव्हा आश्चर्यचकित झालेला शूद्र क्षपणकाकडे येऊन विचारू लागला. तेव्हा क्षपणकाने तुला प्राप्त झालेल्या धनाचा तू त्याग केलास. तुझ्या भाग्यातच धन दिसत नसल्याने तू धनाच्या अभावाने सर्वांना दुःख देणार आहेस तरी शीघ्र धनाचा स्वीकार कर. तेव्हा क्षपणकाला त्या शूद्राने सांगितले की , "धन हे प्राणघातक व पापसाधक आहे. संतोष हेच शुद्ध धन दया हाच जप. अहिंसा हिच थोर सिद्धी. उपवास हिच मोठी तपस्या म्हणून मी धनाची इच्छा करीत नाही."

शूद्राचे हे बोलणे ऐकताच सर्व देवांनी त्याच्या शरीरावर, मस्तकावर पुष्पवृष्टी केली. गंधर्वांची गाणी सुरू झाली. आकाशातून एक विमान भूमीवर आले. क्षपणकानेही आपले मूळ रूप प्रकट केले त्यांनी शूद्रास परिवारासह विमानात बसून स्वर्गात नेले.[12]

या कथेत शूद्राचे आचरण अत्यंत धार्मिक व निष्कलंक होते. जे तपस्येने सुद्धा साध्य होण्याजोगे नाही. शूद्राने आपल्या आचरणाने तपस्व्यांनाही लाजवलेले आहे. सर्व षड्विकार जिंकलेले आहेत. आपल्या जीवनात दया, अहिंसा, इ. उच्च मूल्ये त्यांनी अंगीकारिलेली होती. त्यामुळेच स्वर्गप्राप्ती सारखे अंतिम सुख त्याला प्राप्त झाले.

येथे माणूस हा आचरणाने पवित्र हवा, जन्माने वा वर्णाने त्याचे पावित्र्य ठरत नाही तर केवळ

शुद्ध आचरणानेच त्याचे महत्व ठरते. त्या आचरणाशी कुठल्याही वर्णाचा संबंध नसतो. कुठल्याही वर्णियाने केलेले शुद्ध आचरण त्या काळात सर्वांना मान्य ही होते. सर्वसामान्यांनाच नव्हे तर देवादिकांनाही ते मान्य होते व अशा शुद्ध, पवित्र आचरणाच्या त्या व्यक्तीस स्वर्गप्राप्ती ही सुलभ प्राप्त होऊ शकत होती. दया, अहिंसा, संतोष, निर्लोभीवृत्ती ही तत्वे माणसाने दैनंदिन आचरणात बाणवावीत. त्याला अंतीम सुख प्राप्त होईलच परंतु अशी मूल्ये अंगी बाणविण्यासाठी त्या माणसाने कुठल्याही वर्णियाचे असावे. अमुक एकाच वर्णियाने अमुकच वर्तन करावे तरच त्याला स्वर्गप्राप्तीसारखे फळ प्राप्त होईल अशी कुठलीही अट वा नियम नाही. फक्त त्या माणसाने शुद्ध व पवित्र आचरण करावे एवढेच ही कथा सांगते.

या सर्व कथांकडे एक नजर टाकली असता आपणास असे आढळते की काही वेळेस या वर्णावर्णातील भेद अगदी टोकाला गेलेले आढळतात. तर काही वेळेस या कथांमध्ये वर्णभेदांची बंधने अत्यंत शिथिल झालेली आढळतात आणि त्यामुळेच एक निश्चित असा निष्कर्ष काढणे अत्यंत कठीण आहे. एवढे मात्र नक्की की काही कथांतून वर्तनाला, आचारविचाराला वर्णापेक्षा अधिक महत्व दिलेले आहे आणि म्हणूनच काही कथांमध्ये कोणताही वर्णिय कोणत्याही वर्णामध्ये सहज जाऊ शकत असे व तेथेच सहजपणे समाविष्ट केला जात असे दिसते.

* * *

1. ऋग्वेद 10, 9, 12

2. वाल्मीकी रामायण : 1.65

3. मत्स्यपुराण - 10, भागवत पुराण 4.13

4. वाल्मीकी रामायण : 3.74.8

5. वाल्मीकी रामायण : 3.74.19

6. वाल्मीकी रामायण : 3.74.10

7. मनुस्मृती : 10.127

8. भागवत पुराण : 6.1.2

9. पद्मपुराण उत्तरखंड : 17

10. महाराष्ट्रीय ज्ञानकोश : प्रस्तावना खंड वि. दोन
विषयांतर वेदोक्त इतिहास व आख्यायिका पान 339
श्री. व्यं. केतकर, 1921 प्रकाशक म. ज्ञानकोशमंडळ लिमिटेड, नागपूर

11. ऐतरेयब्राह्मण : 7.13.18

12. पद्मपुराण : 1.53